# श्री.यशवंतराव मोहिते यांचे सहकार चळवळीतील योगदान

**श्री. केतन लाटे,**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**श्री.यशवंतराव मोहिते यांचा परिचयः** श्री.यशवंतराव जिजाबा मोहिते हे स्वतंत्र प्रज्ञेचे विचारवंत, कृतीशील तत्त्ववेत्ते आणि निष्ठावंत पुरोगामी विचाराचे नेते म्हणून सर्व महाराष्ट्राला परिचित होते. त्यांनी महाराष्ट्रातील विधानसभेचे सदस्य म्हणून 1952 पासून 1980 पर्यंत सलग 28 वर्षे काम केले. दरम्यान मंत्रीमंडळात गृहउपमंत्री, कृषीउपमंत्री, गृहनिर्माण व परिवहनमंत्री, सहकारमंत्री व अर्थमंत्री म्हणून सलग 18 वर्षे उल्लेखनीय कार्य केले. प्रत्येक खात्यावर त्यांनी आपल्या कार्यातुन विशेष छाप सोडली. तसेच 1980 ते 1984 दरम्यान कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधी केले. त्यानंतर सक्रीय राजकारणातून निवृत्ती घेऊन सहकाराच्या माध्यमातुन सर्वसामान्यांच्या विकासासाठी शेवट पर्यंत प्रयत्न केले.

1954 साली विरोधी पक्षातील आमदार असताना महाराष्ट्रातील सहकारी तत्वावर चालणारा दुसरा सहकारी कारखाना कृष्णा अनेक अडचणींना सामोरे जाऊन सुरु केला व श्री. मोहिते त्याचे पहिले चेअरमन झाले. महाराष्ट्रात डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, डॉ. धनंजय गाडगीळ व वसंतदादा पाटील यांच्या बरोबरीने महाराष्ट्रात सहकार चळवळ रुजवण्याचे, वाढवण्याचे कार्य श्री. मोहिते यांनी केले. सहकारमंत्री म्हणून सलग 9 वर्षे सहकाराच्या माध्यमातून गरीब, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व कामगार यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे यासाठी विविध योजना राबवल्या.

**सहकार चळवळीबाबत श्री. यशवंतराव मोहिते यांचे विचारः** श्री. यशवंतराव मोहिते यांची वैचारिक बैठक हि समाजवादाची होती त्यामुळे शेती आधारित उद्योगांवर शेतकऱ्यांची मालकी असली पाहिजे यातत्वावर सहकारी चळवळीची उभारणी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गरजू लोकांकडे माणूस म्हणून पाहणे व कोणत्याही तर्हेचा भेदभाव न करता त्यांना मदत करणे हा सहकार चळवळीचे आधार व मूळ आहे आणि तो कटाक्षाने पाळला गेला पाहिजे याबाबत ते कायम आग्रही राहिले. सहकारी संस्था काढणे सोपे असते मात्र त्या यशस्वीपणे चालवणे अवघड असते. कारण ज्या व्यक्तीच्या हातात त्या असतात यावर संस्थांचे यशापयश अवलंबून असते. जशी आपण आपल्या कुटुंबाची काळजी घेतो तशी आपण यासंस्थाची घेतली पाहिजे असे मोहिते कळवळीने सांगत.

**सहकार चळवळीच्या पुनर्रचनेसाठी प्रयत्नः** सहकार खात्याचा पदभार स्विकारल्यानंतर श्री.मोहिते यांनी सहकार चळवळीचे यशापयश, चळवळी बद्दलाच्या अपेक्षा आणि त्यांची पुर्ती याबाबतचे मूल्यमापन करणारा व त्यातील चुका दाखवून त्यावर उपाय सुचवणारा " महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे पुनर्मुल्यांकन " हा ग्रंथ लिहिला व त्याद्वारे सहकार चळवळीचे पुनरुजीवन करण्यासाठी विविध प्रस्ताव मांडले. दुषित होत असलेल्या व आपल्या उद्दिष्टांपासून दूर जात असलेल्या सहकाराला पुन्हा मूळ मार्गावर आणण्याचे काम याद्वारे होईल तसेच महाराष्ट्रातील सहकार चळवळीची पुनर्रचना ही १) पिक उत्पादनासाठी पुरेसा कर्जपुरवठा २) उत्पादकाला त्याच्या मालाचा योग्य मोबदला मिळवून देणे व पिक कर्जाची वसुलीसाठी खरेदीविक्री संघाची स्थापना करणे. ३) कृषी औद्योगिक व्यवस्थेचा पाया घालण्याची जबाबदारी जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेवर टाकणे, या तीन गोष्टींवर आधारित आहे. या मार्गाने मार्गक्रमण केल्यास सहकारी चळवळीला गती प्राप्त होऊन, गरीबांचा आर्थिक स्तर सुधारण्यासाठी तिचा निश्चित उपयोग होईल असा विश्वास श्री.मोहिते यांनी व्यक्त केला. सहकार चळवळीतील विकास व सत्ता यादोन्ही गोष्टी मनात बाळगणारी कार्यकर्ते मंडळी सरकारवर दडपण आणतात आणि सरकार त्याला बळी पडताना आपण बघतो. हि मूलगामी सहकाराची शोकांतिका आहे. राज्यातील सहकारी संस्था वाढुन त्यांच्या व्यवहारात वाढ झाल्याने त्यांच्या लेखापरीक्षणाचा दर्जा सुधारून ते परिणामकारक व्हावे तसेच सहकारी संस्थांतील गैरप्रकारांचे निर्मुलन व्हावे यासाठी १) फिरते पथक २) पोलीस दलाचा वापर ३) राज्य सहकारी लेखासमिती यांसारखे उपाय श्री.मोहिते यांनी सुचवले. सहकारी चळवळीची पुनर्रचना केल्यास समाजवादी युग निर्माण करण्याचे आपले उद्दिष्ट नक्की साध्य होईल अशी प्रामाणिक श्रद्धा श्री. मोहिते यांची होती.

**सहकारातुन शेतकरी विकासासाठी प्रयत्न**

**१) सहकारी साखर कारखानदारीः** प्रवरानगर येथील पहिल्या सहकारी साखर कारखान्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील दुसरा सहकारी तत्वावरील कारखाना श्री.मोहिते यांनी कृष्णानदीच्या काठावर रेठरे बुद्रुक येथे उभारला तोही विरोधी पक्षात असताना. आणि पुढे तो सहकरी तत्वावर यशस्वीपणे चालवून

दाखवला. सहकार म्हणजे काय असते हे बघायला देशाच्या वेगवेगळ्या भागातून लोक रेठरे बुद्रुक मध्ये येऊ लागले. कारखान्याच्या माध्यमातून अनेक योजनांचा उगम झाला. जलसिंचन योजना, सहकारी कुक्कुटपालन, वराहपालन, सहकारी बँक, शिक्षण प्रसारक मंडळ अशा अनेक संस्था शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित समाजाच्या विकासासाठी निर्माण करण्यात आल्या. श्री.मोहिते यांनी सहकारमंत्री झाल्यानंतर साखर कारखानदारीमध्ये वेगवेगळे नाविन्य पूर्ण प्रयोग राबवले. महाराष्ट्रात नवीन सहकारी तत्वावर साखर कारखाने निर्माण करण्यासाठी परवानग्या दिल्या तसेच अस्तित्त्वात असलेले जास्तीत जास्त खाजगी साखर कारखाने सहकारी करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यामुळे कारखान्यांची संख्या 26 वरुन 72 झाली. सहकारी साखर उद्योगाला दिशा देण्यासाठी साखर संचालनालयाची स्थापना केली. याशिवाय कारखाना उभारण्यासाठी आवश्यक असलेले प्रचंड भांडवल, पाणीपुरवठ्याच्या सोई, ऊसविकास, कारखान्याची उभारणी असे प्रश्न परिणामकारकरित्या सोडवण्यासाठी साखर उद्योग विकास महामंडळाची स्थापना केली.

२) **कापूस एकाधिकार योजनाः** महाराष्ट्रातील कापूस उत्पादन व वस्त्रोद्योग हा साखर कारखानदारी प्रमाणेच प्रत्यक्ष शेतात राबणारा, गिरणीत काम करणारा व हातमाग वा यंत्रमाग चालवणारा यांच्याच मालकीचा झाला पाहिजे या भावनेतून कापूस एकाधिकार योजना सुरु करण्यात आली. कापसाचे एकरी उत्पादन वाढवल्याशिवाय व कापसाला योग्य दर दिल्याशिवाय शेतकर्यांची परिस्थिती सुधारणार नाही हे लक्षात घेउन श्री. मोहिते यांनी कापूस एकाधिकार योजना सुरु केली. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही श्री. मोहिते यांना चांगली साथ दिली. सुदान, इजिप्त देशांतील कापूस योजनांचा अभ्यास करून राज्यातील शेतकर्यांच्या कापसाला योग्य भाव मिळवून देण्याची जबाबदारी सरकारची आहे या नात्याने अंमलबजावणी सुरु केली.

त्याचबरोबर उत्तम प्रतीच्या कापसाची निर्मिती करणे व त्याची निर्यात करण्यासाठी श्री. मोहिते यांनी पुढाकार घेतला. या योजनेतून उत्पादक, कामगार व ग्राहक म्हणून सामान्य माणूस यांचे हित साधता येईल अशी नवी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न मोहिते यांनी केला. खरे तर अशा क्रांतिकारी योजनेचा प्रचार व अवलंब संपूर्ण देशात व्हायला पाहिजे होता. मात्र यास विरोधकांबरोबर सत्ताधारी वर्गाने देखील काही कारणास्तव यास विरोध केला. तत्कालीन राजकीय परिस्थिती, भांडवलशाही धार्जिण्या व खुल्या व्यापाराचा पुरस्कार करण्याच्या धोरणाला हि योजना बळी पडली असे मत खुद्द मोहिते यांनी विधानसभेत प्रश्नोत्तरा दरम्यान व्यक्त केले.

3) **सहकारी तत्वावर शेतीपूरक धंदयांना प्रोत्साहनः** सहकारी कारखान्याचा यशस्वी प्रयोग राबवल्यानंतर सहकारमंत्री असताना प्रत्येक शेतकर्याचा विकासासाठी शेतीपूरक जोडधंदे सुरु करण्याला प्रोत्साहन दिले. त्यात, अ) सहकारी दुग्ध उत्पादन व पुरवठा ब) सहकारी गृहनिर्माण संस्था क) वाहतुक संस्था ड) सहकारी रुग्णालय इ) मच्छिमार संस्था, ई) वराहपालन व कुक्कुटपालन संस्था तसेच भांडवल पुरवठ्यासाठी सहकारी तत्वावर बँकिंग व्यवस्था, सोसायट्या, यासारख्या संस्थांचा समावेश होता.

**निष्कर्ष** :१)समाजातील दुर्बल घटकांच्या परीस्थितीत सुधारणा होण्यासाठी सहकार चळवळीचा योग्य वापर यशवंतराव मोहिते यांनी केला असल्याचे दिसून येते.

२) श्री. यशवंतराव मोहिते यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे सहकार चळवळीकडे पाहण्याचा राज्यकर्त्यांचा व समाजाचा दृष्टीकोन बदलण्यास मदत झाली.

३) सहकार क्षेत्रातील यशवंतराव मोहिते यांचे मूलगामी विचार व त्यांनी सुचवलेल्या कायद्यातील दुरुस्त्या यांमुळे सहकारास लोकाभिमुख बनवण्यासाठी कारणीभूत ठरल्या.

४) श्री. यशवंतराव मोहिते यांनी ठरवलेल्या अभ्यासू धोरणामुळे सहकार चळवळीची प्रगती दिसून येते.

५) श्री. यशवंतराव मोहिते यांच्यानंतर सहकारातील सुधारणांकडे दुर्लक्ष झाले, त्यातील काही उद्दिष्टे आजही पूर्ण झालेली दिसत नाहीत यातून राजकारणी, सहकारातील नेते मोठे झाले, पण तळागाळातील माणूस अजूनही यापासून दूर राहिलेला दिसतो.

**संदर्भसूची** १) मोहिते यशवंतराव. महाराष्ट्र राज्यसहकारी चळवळ एक पुनर्मुल्यांकन,

२) यशवंतरावजी मोहिते गौरवग्रंथ.

३) महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि युती शासनाचे धोरण.

४) सहकारातील आव्हाने आणि नेतृत्व, दै.पुढारी कोल्हापूर, 1जाने. 1994

५) घणाघात, यशवंतराव मोहिते यांच्या भाषणांचा संग्रह.

६) महाराष्ट्र राज्य विधानसभा प्रश्नोत्तरे.